(महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय भाग-६ अ करीता )

क्र.पोमसं/३/११/६/निवडसूची २०२२-२३/१९२/२०२२
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय**
शहीद भगतसिंह मार्ग, कुलाबा, मुंबई-०१.
दिनांक :-१३ /०९/२०२४

वाचा:
१ शासन निर्णय, समान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्यासन १२, दिनांक ०१/०८/२०१९
२. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्र. बीबीसी-२०१८/प्र.क्र.३६६/ १६-ब, दिनांक ०७/०५/२०२१
३. महसुल विभाग वाटप नियम-२०२१, दिनांक १४/०७/२०२१
४. अर्जदार वर्षा अरुण शिंदे यांनी पो.नि.पदी पदोन्नती मिळण्याबाबत मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल केलेल्या मूळ अर्ज क्र.८२२/२०२४ मध्ये मा. न्यायाधिकरण यांचे दि.१९.०७.२०२४ रोजीचे आदेश.

**-:आदेश :-**

१. उपरोक्त संदर्भ क्र.२ मध्ये नमूद केलेल्या दिनांक ७/०५/२०२१ च्या शासन निर्णयानुसार पदोन्नतीच्या कोटयातील पोलीस निरीक्षकांची सर्व रिक्त पदे दिनांक २५/०५/२००४ च्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेने भरण्यात येत असून, दिनांक २५/०५/२००४ नंतर शासन सेवेत रुजु झालेल्या सहायक पोलीस निरीक्षकांना त्यांच्या मुळ सेवाज्येष्ठतेनुसार पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नती देण्यात येत आहे. संदर्भ क्र.२ मधील शासन निर्णयानुसार विभागीय पदोन्नती समितीने सहायक पोलीस निरीक्षक यांना पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नती देण्यासाठी दि.२१/०३/२०२३ रोजी पात्रता तपासुन सन २०२२-२३ ची निवडसुची तयार केली आहे.

२. या कार्यालयाचे ज्ञापन दि.०५.०८.२०२४ अन्वये ११ स.पो.नि. यांचे महसूल विभाग पसंती मागविण्यात येऊन त्यांना सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना दि.१४.०७.२०२१ मधील तरतुदीनुसार महसूल विभाग वाटप करण्यात आलेला आहे.

३. महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम-२२ न नुसार पोलीस आस्थापना मंडळ क्रमांक २ यांना प्रदान असलेल्या अधिकारांचा वापर करुन, खालील नमूद ११ सहायक पोलीस निरीक्षकांना त्यांनी कार्यभार ग्रहण केलेल्या दिनांका पासून **"पोलीस निरीक्षक"** पदावर **तात्पुरत्या स्वरुपात** पदोन्नतीवर त्यांची पदस्थापना त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या रकाना क्र. ५ मधील घटकांत करण्यास पोलीस आस्थापना मंडळ क्रमांक २ यांनी मान्यता दिली आहे:-

| अ.क्र. | सपोनि यांचे नांव | सध्याची नियुक्ती | वाटप महसूल संवर्ग | पो.नि.पदावर तात्पुरत्या पदोन्नतीवरील नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | गणेश मधुकर कानडे | नवी मुंबई | कोकण-२ | मुंबई शहर |
| २ | रामदास छबुराव पालवे | बीड | अमरावती | अमरावती शहर |
| ३ | मिलींद लालालसाहेब झोडगे | लोहमार्ग पुणे | कोकण-२ | ठाणे शहर |
| ४ | अनिल भालचंद्र जाधव | सांगली | कोकण-२ | मुंबई शहर |
| ५ | चिमणाजी वैजनाथ केंद्रे | सातारा | कोकण-२ | लोहमार्ग, मुंबई |
| ६ | पंकज श्रीधर गिरी | कोल्हापूर | कोकण-२ | मुंबई शहर |
| ७ | अशोक हणमंत हुलगे | सातारा | कोकण-२ | मुंबई शहर |
| ८ | पवन मनोहर पाटील | नवी मुंबई | कोकण-२ | मुंबई शहर |
| ९ | चंद्रकांत उत्तमराव पाटील | नंदूरबार | नागपूर | वर्धा |
| १० | श्रीनिवास शांताराम चेवले | मुंबई शहर | कोकण-२ | मुंबई शहर |
| ११ | वर्षा अरुण शिंदे | म.प.सु. | नागपूर | लोहमार्ग, नागपूर |

४. वर नमूद केलेल्या तात्पुरत्या पदोन्नतीच्या आदेशाधिन असलेल्या सहायक पोलीस निरीक्षकांविरुध्द न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असेल / निलंबनाची कार्यवाही केली असेल / विभागीय चौकशी प्रलंबित असेल / शिक्षा प्रस्तावित / प्रलंबित / भोगत असतील तर संबंधित घटक प्रमुखांनी त्यांना पदोन्नतीवर कार्यमुक्त न करता त्यांच्या विरुध्दच्या प्रकरणांची सविस्तर माहिती या कार्यालयास ई-मेलव्दारे (desk3.dgoffice@mahapolice.gov.in) / ई-ऑफिसद्वारे तात्काळ पाठवावी व पुढील आदेशाची वाट पहावी.

५. सदरील आदेश मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ तसेच, मा.उच्च न्यायालय येथे शासनाने दाखल केलेली रिट याचिका क्र.१५४८/२०२३ च्या अंतिम आदेशांच्या अधिन राहुन व महाराष्ट्र शासनाच्या संदर्भाधिन दिनांक ०७/०५/२०२१ च्या शासन निर्णयाच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहेत.

६. सदर पदोन्नती आदेशांमधील सहायक पोलीस निरीक्षक हे जर आदेशांमध्ये नमूद केलेल्या घटकामध्ये सध्या कार्यरत नसतील तर, ते ज्या घटकांत कार्यरत आहेत, त्या घटक प्रमुखांनी त्यांना पदोन्नतीच्या घटकांत हजर होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करावे व तसे या कार्यालयास न चुकता कळवावे.

७. मा.न्यायालय / मा.म.प्र.न्यायाधिकरण यांनी जर एखाद्या प्रकरणी काही आदेश निर्गमित केले असतील तर त्यांच्या आदेशांचा अवमान होणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच, मा.भारतीय निवडणूक आयोगाच्या दि.३१.०७.२०२४ च्या पत्रातील तसेच मा.मुख्य निवडणूक अधिकारी यांनी वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचा भंग होणार नाही, याचीही दक्षता घ्यावी.

८. पदोन्नत झालेल्या सर्व अधिकाऱ्यांचे पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी अभिनंदन केले आहे.

**रश्मि शुक्ला**
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,

पोलीस आयुक्त, मुंबई शहर (सस्नेह)
अपर पोलीस महासंचालक, वाहतूक / लोहमार्ग महाराष्ट्र राज्य, मुंबई
पोलीस आयुक्त, नवी मंबई / ठाणे शहर / लोहमार्ग मुंबई / अमरावती शहर
विशेष पोलीस महानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र, छत्रपती संभाजीनगर / कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर / नाशिक परिक्षेत्र, नाशिक / नागपूर परिक्षेत्र, नागपूर
पोलीस अधीक्षक बीड / सांगली / सातारा / कोल्हापूर / नंदूरबार / वर्धा / लोहमार्ग पुणे / लोहमार्ग नागपूर

**प्रत सविनय सादर,**

मा.मुख्य निवडणूक अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-३२.

अपर मुख्य सचिव (गृह),
महाराष्ट्र शासन, मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-३२ (लक्षवेध :-कक्ष अधिकारी, पोल-५ब).

**प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी:-**

कार्यासन अधिकारी, का.क्र. २, ४, ९, ११, ११-अ, १४-अ, ३६, ४०
व का.क्र.३ मधील सेवाज्येष्ठतेचे कामकाज हाताळणारे संबंधित लिपिक (पोमसं कार्यालय).

**प्रत,**

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोमसं., कार्यालय
२/- यांनी सदरचे पोलीस निरीक्षक पदोन्नतीचे आदेश (API to PI Promotion Order) या विषयाखाली पोलीस महासंचालक कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर ०१ महिन्यासाठी उपलब्ध करुन द्यावे.

13/8/24

**( संजीव कुमार सिंघल )**
अपर पोलीस महासंचालक (आस्थापना)
पोलीस महासंचालक यांचेकरिता.